अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११५ /२०२५ दि. ०६/०६/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. ०७/०६/२०२५ रोजी **'बकरी ईद' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** साजरा करण्यात येणार आहे. सदर दिवशी मुस्लिम धर्मीय मोठया प्रमाणात पहाटे पासुनच नमाज पडणेसाठी गैबन शहा दर्गा व मदिना मस्जिद समोरील मैदान या ठिकाणी मोठया संख्येने जमा होतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **चंद्रकात दत्तात्रय भोसले, सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, अतिरीक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) अंबरनाथ रेल्वे स्टेशन कडुन कोहोजगाव मार्गे चिंचपाडा येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोहोजगाव नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – कोहोजगाव नाका येथुन सरळ वुलन चाळ येथुन मक्का मस्जिद मार्गे दिपक नगर येथे डाव्या बाजुने वळुन पुढे दुर्गा काली मंदिर मार्गे चिंचपाडा चौकातुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) चिंचपाडा येथुन कोहोजगाव मार्गे अंबरनाथ शहरामध्ये येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चिंचपाडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – चिंचपाडा चौक येथुन डावे बाजुने वळुन पुढे दुर्गा काली मंदिर मार्गे पुढे उजवे बाजुला वळण घेवुन दिपक नगर येथुन गावदेवी चौक मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील. किंवा दिपक नगर येथुन मक्का मस्जिद समोरुन वुलन चाळ, कोहोजगाव नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **'बकरी ईद' एक दिवस मागे किंवा पुढे चंद्र दर्शनानुसार** दि. ०७/०६/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. ते सकाळी १०:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(चंद्रकात दत्तात्रय भोसले)
सहायक पोलीस आयुक्त,
ठाणे वाहतुक विभाग, ठाणे शहर
अतिरीक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

CamScanner

प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/पोनि, उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner